CCPS An AIChE Technology Alliance
Center for Chemical Process Safety
www.aiche.org/ccps

Process Safety Beacon
http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक
ioMosaic
www.iomosaic.com

# चुकीच्या होजमुळे अमोनियाची गळती!

नोव्हेंबर २०१५






जुलै २००६ मधील एका भल्या पहाटे दक्षिण कॅरोलिनामधील एका कारखान्यात जलहीन अमोनियाचा टँकर, ट्रेलरवरील होजचा वापर करून, एका टाकीमध्ये भरण्याचे काम चालू होते. भरणे चालू झाल्यावर काही वेळाने टँकरला जोडलेला होज फाटला व अमोनिया या विषारी वायूची गळती होवून त्याचा ढग तयार झाला. हा ढग महामार्गावरून वाहत जंगलाच्या भागात गेला व तेथे पसरला. महामार्गावरील एका कारने या ढगातून पसार होण्याचा प्रयत्न केला पण त्या प्रयत्नात ती कार रस्त्याच्या कडेला धडकली. कारचालिका कारमधून बाहेर पडली पण अमोनियाच्या संसर्गामुळे मरण पावली. १४ जणांनी आरोग्यविषयक तक्रारी केल्या व अन्य सात जणांवर श्वसनबंधामुळे उपचार करून त्याच दिवशी घरी सोडण्यात आले. त्या भागातील रहीवाशांना अन्यत्र आसरा घेण्यास सांगण्यात आले आणि महामार्ग काही तासांसाठी बंद ठेवण्यात आला. सुमारे ७००० पौंड अमोनियाची गळती झाली.

चौकशीअंती असे आढळून आले की या गळतीच्या संभाव्य कारणांमध्ये जलहीन अमोनियाशी रासायनिकदृष्टया विसंगत असलेला होज वापर होता. अन्य कारणांमध्ये टँकर रिकामा करण्याची अपुरी पध्दती, व टँकर रिकामा करण्याच्या होजची तपासणी करण्याची अपुरी पध्दती यांचा समावेश आहे. टँकर रिकामा करण्यासाठी वापरलेल्या होजवर "फक्त एलपीजी वहनासाठी" (एलपीजी – लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस). टँकरची वाहतुक करणाऱ्या कंपनीस असे आढळून आले की त्यांच्याकडील एलपीजीच्या ट्रेलर्सपैकी एका ट्रेलरवर अमोनियासाठी वापरण्यासाठी निर्धारित केलेला होज होता व या दुर्घटनेच्या काही दिवसांपूर्वी होजेसची अदलाबदल झाली असल्याची शक्यता आहे. क्षतिगत झालेला चुकीचा होज अमोनिया खाली करण्यास २ ते १२ वेळा वापरला गेला असावा.

## आपण काय करू शकता ?

- लोडींग व अनलोडींग कामासाठी योग्य होजचा वापर केला जात असल्याची खात्री करा. ट्रकबरोबर येणारा होज जर तुम्ही वापरीत असाल तर विशेष काळजी घ्या.
- होजेसवरील लेबल्स व इशारे वाचा व होज वापरास योग्य असल्याची तुम्हास खात्री नसल्यास वरीष्ठांची मदत घ्या.
- ट्रकसोबत आलेल्यासह सर्व होजेसमधील दोष नेहमी तपासा. चांगल्या स्थितीत नसलेले होज वापरू नका. त्याचबरोबर होजच्या जोडण्या व गॅस्केट तपासून घ्या.
- होजेस दुमडू नयेत. त्यावरून कोणते वाहन जावू नये किंवा त्यांची हानी होवू नये यासाठी त्यांची साठवणी योग्य प्रकारे करा.
- तुमच्या कारखान्यातील होजेसच्या तपासणी व बदलण्याबाबतच्या तरतूदींची पूर्तता करा.
- ट्रकबरोबर येणारा होज जर तुम्ही नियमितपणे वापरीत असाल आणि जर तुम्हाला होज वेगळा वाटत असेल तर कोणाला तरी तो तंमच्या कामास वापरायोग्य आहे का ते तपासण्यास सांगा.
- होज खराब होण्यामुळे घडलेल्या अन्य दुर्घटनांवरील माहितीसाठी ऑगस्ट २००४, जुलै २००७ आणि ऑक्टोबर २०११ च्या बीकॉनच्या आवृत्त्या वाचा.

**तुम्ही योग्य होज वापरीत आहात काय?**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा ६४६–४९५–१३७१

हे बीकॉन सहसा अरेबिक, अफ्रीकन, चिनी, झेक, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रोमानियन, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तेलगू, थाई, तुर्की, आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.